159

मुख्य कामगार अधिकारी
रा. प. मध्यवर्ती कार्यालय,
मुंबई - ४०० ००८.

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

आणि

## महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना (मान्यताप्राप्त)

यांच्यामधील

# कामगार करार

(दि.१.४.२०१२ ते ३१.३.२०१६)

140

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई
पं. मु. विक्रेता क्र. २०५
6 JUN 2013
सक्षम अधिकारी

क्र.. 104 दिनांक :

HK 108668

18 JUN 2013

विक्रेती सौ. ज्योती प्र. दुआ
६, कोंडांजी चाळ नं. ३, वासुदेव पंडणेकर मार्ग,
टाटा हॉस्पिटल जवळ, मुंबई - १२.
श्री/श्रीमती M.S.R.T.C.
यांस न्यायिकेतर मुद्रांक पेपर विकला.
L.S.V. No. 205

Head Office
M.Central-M-25

स्टॅम्प वेंडर
परेल मुंबई

श्री. .... मर्दणे

## समझोत्याचे संक्षेप लेख

**औद्योगिक विवाद अधिनियम १९४७चे कलम २ (प) सहित कलम १८(१) औद्योगिक विवाद (मुंबई) नियम ६२ च्या अन्वये**

## उभयपक्षकारांची नावे

| | |
|---|---|
| **नियोक्त्याचे (मालकाचे ) प्रतिनिधी** | : **श्री.दीपक कपूर ,भा.प्र.से.**<br>**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**<br>**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ** |
| **कामगारांचे प्रतिनिधी** | : **श्री.हनुमंत ताटे,**<br>**जनरल सेक्रेटरी,**<br>**महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना( मान्यताप्राप्त संघटना )** |

## प्रकरणाचे संक्षिप्त कथन

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ(व्यवस्थापन)आणि महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना (मान्यताप्राप्त संघटना) यांच्यात दि.०९.०९.२००९ रोजी झालेल्या कामगार कराराचा कालावधी दि.१.४.२००८ ते ३१.३.२०१२ या चार आर्थिक वर्षांसाठी होता.

सन २००८-२०१२ या कालावधीच्या कामगार करारातील कलम २४(७) नुसार या कराराची मुदत संपल्यानंतर या करारातील तरतुदी /सवलती /आर्थिक फायदे नवीन करार होईपर्यंत अंमलात राहतील असे मान्य केलेले आहे. सन २००८-२०१२ या कामगार कराराची मुदत दि.३१.३.२०१२ रोजी संपलेली आहे.

जनरल सेक्रेटरी, महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना यांनी पत्र क्र.२२/२०१२ दि.२७ फेब्रुवारी,२०१२ अन्वये दि.१.४.२०१२ पासून सुरु होणाऱ्या नविन कामगार करारासाठी एकूण ३११ मागण्यांचा प्रस्ताव पाठविलेला होता. सदर मागणी प्रस्तावामध्ये महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्रपणे १४ मागण्यांचा समावेश होता.

नविन कामगार करारासाठी संघटनेने दिलेल्या मागण्यांबाबत चर्चा करण्यासाठी संचालक मंडळाने उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली महामंडळ ठराव क्र.२०१२:०६:०३ दि.२०.६.२०१२ अन्वये वाटाघाट समिती गठीत केली होती.

दिनांक १९.१२.२०११ रोजी नागपूर येथे मान्यताप्राप्त संघटनेसमवेत त्यांनी दिलेल्या आंदोलन नोटीसीसंदर्भात झालेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी कनिष्ठ वेतनश्रेणीचा कालावधी ५ वर्षावरुन ३ वर्षे करण्यास तत्वत: मान्यता देऊन ही बाब कामगार करारात धरणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले होते. तसेच,रा.प.महामंडळातील कामगारांना किमान वेतनाएवढे वेतन देणे आवश्यक आहे अशा सूचना दिल्या होत्या.

वाटाघाट समितीच्या एकूण १३ बैठका घेण्यात आल्या. याशिवाय मा.अध्यक्ष, रा.प.महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली मान्यताप्राप्त संघटनेच्या प्रतिनिधीसमवेत २ बैठका झाल्या.

दिनांक १३.९.२०१२ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या व्यवस्थापन व मान्यताप्राप्त संघटनेच्या प्रतिनिधींच्या बैठकीमध्ये कामगार कराराबाबत महामंडळ स्तरावर ठराव मंजूर करुन शासनास पाठविण्याच्या सूचना दिल्या होत्या.

दि.२४.९.२०१२ रोजी झालेल्या वाटाघाट समितीच्या बैठकीमध्ये उत्पादकता वाढविण्याच्या व्यवस्थापनाच्या मुद्दयांवर चर्चा करताना उत्पादकता वाढविण्यासाठी व्यवस्थापनाने आग्रह धरला.

मा.मुख्यमंत्री,मा.उप मुख्यमंत्री यांनी दिलेल्या सूचना कामगार कराराच्या वाटाघाटी करताना विचारात घेतलेल्या आहेत. वाटाघाट समितीने दिलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने दि.५.१०.२०१२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला. सन २०१२-२०१६ या कालावधीच्या कामगार करारासाठी संचालक मंडळाने ठराव क्र.२०१२:१०:०२ दि.५.१०.२०१२ पारीत केला असून सदरचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी दि.५.१०.२०१२रोजी पाठविण्यात आला. त्यातील प्रमुख मागण्यांवर वार्षिक अंदाजे रु.३१०.१२ कोटी आर्थिक भार अपेक्षित आहे.

सन २०१२-२०१६ या कालावधीच्या कामगार करारासंबंधी दि.११.११.२०१२ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मान्यताप्राप्त संघटनेच्या प्रतिनिधी समवेत झालेल्या बैठकीमध्ये सन २०१२-२०१६च्या कामगार करारापोटी प्रत्येक कामगारांना रू.५०००/- उचल एक वेळची बाब म्हणून देण्यात यावेत असे जाहीर केले. त्यानुसार शासनाने पत्र क्र.एसटीसी-११-१२/प्र.क्र.१०१९/परि-१ दि.१९.११.२०१२ अन्वये प्रत्येक कामगारांना रू.५०००/- उचल देण्यास मंजूरी दिलेली असून सदर उचल रक्कमेचे वाटप झालेले आहे. सन २०१२-२०१६ या कालावधीच्या कामगार करारापोटी कामगारांना देय असलेल्या थकबाकीतून सदर उचल रक्कम समायोजित करण्यात येईल.

रा.प.महामंडळाने दि.५.१०.२०१२ रोजी पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन पातळीवर दि.२.२.२०१३ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन व मान्यताप्राप्त संघटनेचे प्रतिनिधी यांच्या समवेत निर्णायक बैठक झाली. सदर बैठकीस प्रधान सचिव (परिवहन), मा.अध्यक्ष, रा.प.महामंडळ, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तसेच मान्यताप्राप्त संघटेनेचे अध्यक्ष, जनरल सेक्रेटरी व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्णयानुसार शासनाने पत्र क्र.बैठक १०१२/प्र.क्र.९६२/परि-१ दि.१२.०२.२०१३ अन्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

१. दि.१.४.२०१२ ते दि.३१.३.२०१६ या चार वर्षांच्या कामगार करारासाठी एकूण रु.१६६८ कोटी व वार्षिक सरासरी आर्थिक भार रु.४१७ कोटी यास मान्यता देण्यात आली. यामध्ये २० जुलै,२०१० ते ३१ मार्च,२०१२ या कालावधीतील किमान वेतन व महामंडळाने प्रत्यक्ष दिलेले वेतन यातील फरक याचा समावेश राहील.

२. दि.३१.३.२०१२ रोजी नियमित वेतनश्रेणीत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या दि.३१.३.२०१२ च्या मूळ वेतनात १०% वाढ देण्यात यावी.

३. दि.१.४.२०१२ पासून कनिष्ठ वेतनश्रेणी व एकत्रित वेतनाचा सध्याचा ५ वर्षाचा कालावधी कमी करुन तो ३ वर्षाचा करावा.

   सार्वजनिक मोटार वाहतूक उद्योगास लागू असणाऱ्या किमान वेतनावर आधारीत किमान वेतना इतके वेतन मिळेल अशी कनिष्ठ वेतनश्रेणी दि.१.४.२०१२ पासून लागू करावी. तथापि, वाहक व सहाय्यक (मदतनीस) यांना समान वेतनश्रेणी ठेवावी. करार कालावधीमध्ये सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये मिळणाऱ्या वेतनापेक्षा किमान वेतन कायद्यानुसार किमान वेतन वाढल्यास किमान वेतन व प्रत्यक्ष देण्यात आलेले वेतन यातील फरक संबंधीत कर्मचाऱ्यांना देण्यात यावा.

४. कनिष्ठ वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांसाठी किमान वेतन मिळेल अशी सुधारीत वेतनश्रेणी दि.१.४.२०१२ पासून लागू करावी. तथापि, कनिष्ठ वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांना कराराचा लाभ मिळावा यासाठी दि.३१.३.२०१२ रोजी त्यांचे वेतन सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणीच्या किमान टप्प्याएवढे होते असे गृहीत धरुन त्या मानीव वेतनावर (Notional Pay) त्यांना १०% वाढ देण्यात यावी.

५. दि.२०.७.२०१० ते ३१.३.२०१२ या कालावधीत कनिष्ठ वेतनश्रेणी कर्मचाऱ्यांना महामंडळाने दिलेले वेतन व किमान वेतन कायद्याखालील वेतन यातील फरक आर्थिक स्थिती पाहून संबंधित कर्मचाऱ्यांना टप्प्या-टप्प्याने अदा करावा.

६. मार्ग भत्ता वगळता इतर भत्त्यात सध्याच्या दरात ५०% वाढ करण्यात यावी.

७. नियमित व कनिष्ठ वेतनश्रेणीवरील कर्मचाऱ्यांना समान दराने चालनीय भत्ते अदा करावेत.

८. एकत्रित वेतनावरील कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळेल अशी कनिष्ठ वेतनश्रेणी दि.१.४.२०१२ पासून लागू करावी.

९. उत्पादकता वाढविण्यासाठी बस बांधणीच्या सध्याच्या तासामध्ये २०० तास कमी करावेत. चालक-वाहकांची त्यांच्या आगारात सुरु होऊन त्यांच्याच आगारात संपणाऱ्या कामगिरीसाठी सायनिंग ऑफ ची वेळ १५ मिनिटानी कमी करावी.

सन २०१२ ते २०१६ या कालावधीच्या कामगार कराराबाबत दि.१२.०४.२०१३ रोजी "सहयाद्री राज्य अतिथीगृह, मुंबई " येथे मा.मुख्यमंत्री महोदय यांनी मान्यताप्राप्त संघटनेचे प्रतिनिधी व व्यवस्थापनाच्या प्रतिनिधीसमवेत चर्चा केली. चर्चेअंती दि.०२.०२.२०१३ रोजी झालेल्या बैठकीतील पुढील मुद्यांबाबत निर्णयामध्ये सुधारणा करुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. दि.३१.०३.२०१२ रोजी नियमित वेतन श्रेणीत कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या दि.३१.०३.२०१२ च्या मूळ वेतनात १०% ऐवजी १३% वाढ देण्यात यावी. कनिष्ठ वेतनश्रेणीतील कर्मचा-यांना कराराचा लाभ मिळावा यासाठी दि.३१.०३.२०१२ रोजी त्यांचे वेतन सुधारीत कनिष्ठ वेतन श्रेणीच्या किमान टप्प्याएवढे होते असे गृहीत धरुन त्यावर त्यांना १०% ऐवजी १३% वाढ देण्यात यावी.

२. सुती गणवेशधारी कर्मचा-यांबरोबर टेरीकॉट गणवेशधारी कर्मचा-यांनाही शासन दराप्रमाणे शिलाई व धुलाई भत्ता देण्यात यावा.

३. लिपीक-टंकलेखक संवर्गाची महामंडळाद्वारे प्रस्तावित कनिष्ठ वेतन श्रेणी सुधारीत करण्यात यावी व त्या अनुषंगाने अन्य पदांच्या कनिष्ठ वेतन श्रेणीतील विसंगती दूर करण्यात याव्यात.

४. १९९६-२००० पासूनचे पुढील करारातील आर्थिक लाभ, सोयी सवलती व तरतूदी या करारामुळे सुधारल्या अथवा वगळल्या असतील त्या सोडून अन्य आर्थिक लाभ, सोयी सवलती व तरतूदी सर्व साधारणपणे चालू राहतील.

५. वाटाघाट समितीमध्ये दोन्ही पक्षांनी मान्य केलेल्या मागण्यांचा समावेश कामगार करारात करण्यात यावा.

१६३



दि.१२.४.२०१३रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने संचालक मंडळासमोर प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात आला. संचालक मंडळाने क्र.२०१३:०४:०३ दि.२२.४.२०१३ अन्वये ठराव पारीत केलेला आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने शासनाकडे मंजूरीसाठी पत्र क्र.राप/मुकाअ/५९१ दि.२२.४.२०१३ अन्वये प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता.

वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने त्यांचे पत्र क्र.एसटीसी-१०१२/कामगार करार/प्र.क्र.९२३/परि-१ दि.६.५.२०१३ अन्वये सन २०१२-२०१६ या कालावधीच्या वेतन कराराबाबतचा ठराव क्र.२०१३:०४:०३ दि.२२.४.२०१३ अन्वये संमत केलेल्या प्रस्तावास शासनाची मान्यता कळविण्यात येत आहे. महामंडळाने प्रशासनिक खर्चामध्ये कपात करणे, कार्यक्षमता वाढवून उत्पादन वाढविणे, जे आगार तोट्यात चालू आहेत, त्यांचा अभ्यास करुन त्यांना नफ्यात आणणे, अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देऊन त्यांची कार्यक्षमता वाढविणे, जे मार्ग तोट्यात आहेत त्यांचा सविस्तर अभ्यास करुन, त्यांचा तोटा कमी करणे इ. बाबींवर महामंडळाने कार्यवाही करणे आवश्यक आहे असे सदर पत्रामध्ये नमूद केलेले आहे.

"प्रशासनिक खर्चामध्ये कपात करणे, कार्यक्षमता वाढवून उत्पादन वाढविणे, जे आगार तोट्यात चालू आहेत, त्यांचा अभ्यास करुन त्यांना नफ्यात आणणे, अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देऊन त्यांची कार्यक्षमता वाढविणे, जे मार्ग तोट्यात आहेत त्यांचा सविस्तर अभ्यास करुन, त्यांचा तोटा कमी करणे इ.साठी मान्यताप्राप्त संघटनेशी संवाद साधून व्यवस्थापन ज्या उपाय योजना राबवेल त्यास मान्यताप्राप्त संघटनेचे सहकार्य राहील. तथापि, अशी उपाय योजना करताना ती करारातील तरतुदी, कायदे, परिपत्रके व संयुक्त विचार विनिमय बैठकीतील निर्णय यांच्या अधीन राहील

उपरोक्त शासन पत्रातील सूचना व संचालक मंडळाने मंजूर केलेला वरील ठराव विचारात घेऊन उभयपक्षी समझोता करण्यात आला.

-------------

**सन २०१२ ते २०१६ या कालावधीच्या कामगार करारासाठी सादर केलेल्या मागण्या व त्यावर झालेला समझोता.**

| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| १ | समझोत्याचा कालावधी | हा समझोता दि.१.४.२०१२ ते दि.३१.३.२०१६ या चार वित्तीय वर्षासाठी कार्यान्वित राहील. |
| २ | अग्रीम रक्कमेचे समायोजन. | प्रस्तावित कामगार करार २०१२-२०१६ च्या थकबाकीपोटी कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आलेल्या रु.५०००/- अग्रीम रक्कम व अन्य अग्रीम स्वरुपात अदा केलेल्या रक्कमेचे कर्मचाऱ्यांना देय थकबाकीच्या रकमेतून समायोजन करण्यात येईल. |
| ३ | करारापोटी देय होणारी थकबाकी | दि.१.४.२०१२ पासून करारापोटी देय होणारी थकबाकी अदा करण्याबाबत मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. |
| ४ | नियमित कर्मचाऱ्यांसाठी वेतनश्रेणी | नियमित कर्मचाऱ्यांसाठी जोडपत्र "अ" मध्ये दर्शविल्यानुसार वेतनश्रेणी राहतील. |
| ५ | नियमित कर्मचाऱ्यांसाठी करावयाची वेतन निश्चिती. | दि.३१.३.२०१२ रोजी घेत असलेल्या मूळ वेतनाच्या १३%(तेरा टक्के) वाढ देऊन दि.१.४.२०१२ रोजी वेतन निश्चिती करण्यात येईल. परंतु दि.३१.३.२०१२ रोजी घेत असलेले मूळ वेतन हंगामी/तात्पुरत्या बढती पदाचे असल्यास व पुढे सदर कर्मचारी पदावनत झाल्यास तो हंगामी/ तात्पुरत्या बढतीवर नव्हता असे गृहीत धरुन, दि.३१.३.२०१२ रोजीच्या मूळ वेतनात १३% वाढ देऊन वेतन निश्चिती करण्यात येईल. |
| ६ | कनिष्ठ वेतनश्रेणीचा कालावधी. | ज्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांचा दि.३१.३.२०१२ रोजी सेवाकाळ ३ वर्षे पुर्ण झाला असेल त्यांना दि.१.४.२०१२ पासून नियमित वेतनश्रेणीवर घेण्यात येईल. |
| ७ | कनिष्ठ वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांची सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणीत करावयाची वेतन निश्चिती. | १.कनिष्ठ वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांना सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणी दि.१.४.२०१२ पासून लागू होईल. तथापि, कनिष्ठ वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांना कराराचा लाभ मिळावा यासाठी दि.३१.३.२०१२ रोजी त्यांचे वेतन सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणीच्या किमान टप्प्याएवढे होते असे गृहीत धरुन त्यावर त्यांना १३% वाढ देऊन वेतन निश्चिती करण्यात येईल. |

168



| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| | | २.जे कर्मचारी दि.३१.३.२०१२ रोजी कनिष्ठ वेतनश्रेणीवरील सेवेची ३ वर्षे पूर्ण करून दि.१.४.२०१२ रोजी नियमित वेतनश्रेणीवर येतील त्यांची दि.१.४.२०१२ रोजी नियमित वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करताना कराराचा लाभ मिळावा म्हणून नियमित वेतनश्रेणीचा किमान टप्पा अधिक सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणीच्या (मानीव वेतन) किमान टप्प्याच्या १३% वाढ देऊन वेतन निश्चिती करण्यात येईल.<br><br>३.कराराच्या कालावधीत सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये मिळणाऱ्या वेतनापेक्षा किमान वेतन कायद्यानुसार किमान वेतन वाढल्यास किमान वेतन व प्रत्यक्ष देण्यात आलेले वेतन यातील फरक संबंधीत कर्मचाऱ्यांना देण्यात येईल. |
| ८ | एकत्रित वेतनावरील कर्मचाऱ्याचा कालावधी. | एकत्रित वेतनावरील कर्मचाऱ्यांचा सध्याचा ५ वर्षांचा कालावधी कमी करुन तो दि.१.४.२०१२ पासून ३ वर्षाचा करण्यात येईल. |
| ९ | एकत्रित वेतनावरील कर्मचाऱ्याची सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणीत करावयाची वेतन निश्चिती. | १. एकत्रित वेतनावरील कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी दि.१.४.२०१२ पासून लागू होईल. तथापि, एकत्रित वेतनावरील कर्मचाऱ्यांना कराराचा लाभ मिळावा यासाठी दि.३१.३.२०१२ रोजी त्यांचे वेतन सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणीच्या किमान टप्प्याएवढे होते असे गृहीत धरुन त्यावर त्यांना १३% वाढ देऊन वेतन निश्चिती करण्यात येईल.<br><br>२. जे कर्मचारी दि.३१.३.२०१२ रोजी एकत्रित वेतनावरील सेवेची ३ वर्षे पूर्ण करून दि.१.४.२०१२ रोजी नियमित वेतनश्रेणीवर येतील त्यांची दि.१.४.२०१२ रोजीची नियमित वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करताना त्याना कराराचा लाभ मिळावा म्हणून नियमित वेतनश्रेणीचा किमान टप्पा अधिक सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणीच्या (मानीव वेतन) किमान टप्प्याच्या १३% वाढ देऊन वेतन निश्चिती करण्यात येईल. |

167



| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| १० | किमान वेतनाची थकबाकी. | दि.२०.७.२०१० ते ३१.३.२०१२ या कालावधीत कनिष्ठ वेतनश्रेणी व एकत्रित वेतनावरील कर्मचाऱ्यांना महामंडळाने अदा केलेले वेतन व किमान वेतन कायद्याखालील वेतन यातील फरक मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करून संबंधित कर्मचाऱ्यांना टप्प्या-टप्प्याने अदा करण्यात येईल. |
| ११ | कनिष्ठ वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांसाठी सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणी. | दि.३१.३.२०१२ रोजी सेवेत असलेल्या कनिष्ठ वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांना व तद्‌नंतर सेवेत आलेल्या कनिष्ठ वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांना जोडपत्र "ब" मध्ये नमूद केलेली सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणी लागू राहील. |
| १२ | एकत्रित वेतनावरील कर्मचाऱ्यांसाठी सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणी. | दि.३१.३.२०१२ रोजी सेवेत असलेल्या एकत्रित वेतनावरील कर्मचाऱ्यांना व तद्‌नंतर त्या पदावर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना दि.१.४.२०१२ पासून एकत्रित वेतन पध्दत रद्द करुन त्याऐवजी जोडपत्र "क" मध्ये नमूद केल्यानुसार कनिष्ठ वेतनश्रेणी लागू राहील. |
| १३ | वार्षिक वेतनवाढ | दि.१.४.२०१२च्या सुधारीत वेतनावर कर्मचाऱ्यांच्या नियत देय तारखेस मूळ वेतनाच्या ३% संचित दराने वार्षिक वेतनवाढ देय राहील. मात्र सक्षम प्राधिकाऱ्यांनी शिक्षेच्या परीणामी वेतनवाढ थांबवली असेल त्या प्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार वेतनवाढ देय राहील.<br><br>ज्या कर्मचा-यांचे वेतन दि.१.४.२०१२ रोजी व तद्‌नंतर त्यांच्या नियमित बढतीमुळे/ तात्पुरत्या बढतीमुळे/ निवडश्रेणीमुळे/ श्रेणीकरणामुळे त्यांच्या वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्याच्या पुढे निश्चित झाले आहे अथवा कराराच्या कालावधीत वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर पोहोचतील अशा कर्मचा-यांना वार्षिक वेतनवाढ देय राहील. |

| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| १४ | अ) दि.१.४.२०१२ पासून पदोन्नतीच्या पदावर करावयाची वेतन निश्चिती. | दि.१.४.२०१२ वा तद्नंतर ज्या कर्मचा-यांना तात्पुरती अथवा नियमित पदोन्नती मिळाली आहे,त्यांना त्या दिवशीच्या मूळ वेतनाच्या ३% ची एक वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती करण्यात येईल. मात्र अशा प्रकरणी कर्मचा-याचे परिगणीत केलेले वेतन पदोन्नतीच्या पदाच्या किमान टप्प्यापेक्षा कमी आल्यास त्याची वेतन निश्चिती पदोन्नतीच्या पदाच्या किमान टप्प्यावर करण्यात येईल.<br><br>नियमित पदोन्नतीच्या प्रकरणी जर खालच्या पदावरील वेतनवाढ पुढील ६ महिन्यात येत असेल तर खालच्या पदाची वेतनवाढ मिळेपर्यन्त खालच्या पदात वेतन घेण्याचा विकल्प सध्या प्रमाणे चालू राहील. |
| | ब)चालक व कार्यशाळा कर्मचा-यांच्या निवडश्रेणीच्या पदावर करावयाची वेतन निश्चिती | दि.१.४.२०१२ वा तद्नंतर ज्या कर्मचा-यांना निवडश्रेणी/ श्रेणीकरण मिळाले आहे, त्यांना त्या दिवशीच्या मूळ वेतनाच्या ३% ची एक वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती करण्यात येईल. मात्र अशा प्रकरणी कर्मचा-याचे परिगणीत केलेले वेतन निवडश्रेणीच्या/श्रेणीकरणाच्या पदाच्या किमान टप्प्यापेक्षा कमी आल्यास त्याची वेतन निश्चिती निवडश्रेणीच्या/श्रेणीकरणाच्या पदाच्या वेतनश्रेणीच्या किमान टप्प्यावर करण्यात येईल. |
| | क)श्रेणीकरण अनुज्ञेय असलेल्या कर्मचा-यांच्या वेतननिश्चिती बाबत | ज्या कर्मचा-यांना निवडश्रेणी/श्रेणीकरण ज्या प्रवर्गात मिळाले आहे,त्या प्रवर्गात तात्पुरती अथवा नियमित बढती मिळाल्यास त्यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या ३% ची एक वेतनवाढ देऊन वेतन निश्चिती करण्यात येईल. |
| १५ | कर्मचाऱ्याची कराराची वेतन निश्चिती, वार्षिक वेतनवाढ, बढती, तात्पुरती बढती, निवडश्रेणी, श्रेणीकरणावर वेतन निश्चिती करताना येणारी रक्कम अपूर्णांकात येत असल्यास ती पुढील रूपयाच्या पटीत पूर्णांकित करण्यात यावी. | कर्मचाऱ्याची कराराची वेतन निश्चिती, वार्षिक वेतनवाढ, बढती, तात्पुरती बढती, निवडश्रेणी, श्रेणीकरणावर वेतन निश्चिती करताना येणारी रक्कम अपूर्णांकात येत असल्यास ती पुढील रूपयाच्या पटीत पूर्णांकित करण्यात येईल. |

| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| १६ | सानुग्रह अनुदान | मूळ वेतन+महागाई भत्ता+स्थानिकपूरक भत्ता मिळून दरमहा रु.७०००/- पर्यन्त वित्तलब्धी असणा-या कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानासाठी पात्र समजण्यात येईल. अशा कर्मचा-यांनी १२ महिने काम केले असल्यास जास्तीत-जास्त रु.२५००/- पर्यन्त सानुग्रह अनुदान दिवाळीपूर्वी किमान १० दिवस अगोदर अदा करण्यात येईल. १२ महिन्यांपेक्षा कमी काम केले असल्यास प्रमाणशीर पध्दतीने (Pro rata) रक्कम अदा केली जाईल. |
| १७ | महागाई भत्ता | राज्य शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या नियम व दरानुसार महागाई भत्ता अनुज्ञेय राहील. |
| १८ | घरभाडे व स्थानिक पूरक भत्ता | राज्य शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या नियम व दरानुसार घरभाडे व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील. |
| १९ | शासनाच्या निर्णयाप्रमाणे आदिवासी, अतिसंवेदनशील, नक्षलग्रस्त भागात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यासही शासनाप्रमाणे सुविधा व भत्ता अदा करण्यात यावा. | शासनाच्या निर्णयाप्रमाणे घोषित आदिवासी, अतिसंवेदनशील, नक्षलग्रस्त भागात कार्यरत असणारे व तेथे वास्तव्य करणारे कर्मचारी जर राज्य शासनाच्या निकषाप्रमाणे पात्र ठरत असतील तर त्यांना "प्रोत्साहन भत्ता" अदा केला जाईल. मात्र या व्यतिरिक्त इतर भत्ते व सुविधा देय होणार नाहीत. |
| २० | धुलाई भत्ता | (अ) जे कर्मचारी गणवेष मिळण्यास पात्र आहेत अशा कर्मचाऱ्यांना दि.१.४.२०१२ पासून शासन दराप्रमाणे धुलाई भत्ता अनुज्ञेय राहील.<br><br>(ब) वुलन गणवेषासाठी रु.१८/- वार्षिक दराने व वुलन जर्सीसाठी रु.१४/- वार्षिक दराने दि.१.४.२०१२ पासून धुलाई भत्ता अदा करण्यात येईल. |
| २१ | शिलाई दर | जे कर्मचारी गणवेष मिळण्यास पात्र आहेत अशा कर्मचाऱ्यांना दि.१.४.२०१२ पासून शासन दराप्रमाणे शिलाई दर अनुज्ञेय राहील. |

| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| २२ | **मार्ग भत्ता :-** चालक / वाहकांचे प्रत्यक्ष कामासाठी (स्टेअरिंग व कंडक्टींग डयुटीसाठी ) मार्ग भत्ता देण्यात यावा. | नियमित व कनिष्ठ वेतनश्रेणीवरील चालक/ वाहकांच्या प्रत्यक्ष कामासाठी (स्टेअरींग व कंडक्टींग डयुटीसाठी) खालील प्रमाणे मार्ग भत्ता दि.१.४.२०१२पासून अदा करण्यात येईल.<br>१५० किमी पर्यन्त - रु.४.०० दरदिवशी<br>१५१ किमी ते २०० किमी पर्यन्त- रु.०.०९ प्रती किमी<br>२०१ किमी ते २२५ किमी पर्यन्त- रु.०.१५ प्रती किमी<br>२२५ किमी च्या पुढे - रु.०.२० प्रती किमी |
| २३ | **शहरी वाहतूक मार्ग भत्ता :-** शहरी वाहतूक सेवेत काम करणाऱ्या कनिष्ठ व नियमित चालक / वाहकांना (स्टेअरींग व कंडक्टींग डयुटीसाठी ) देण्यात यावा. | शहर वाहतूक सेवेत काम करणा-या नियमित व कनिष्ठ वेतनश्रेणीवरील चालक/वाहकांना (स्टेअरींग व कंडक्टींग डयुटीसाठी) खालील प्रमाणे मार्ग भत्ता दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल.<br>६० किमी पर्यन्त - रु.४.०० दरदिवशी<br>६० किमी पेक्षा जास्त - रु.०.१२ प्रती किमी |
| २४ | **रात्रवस्ती भत्ता** | नियमित व कनिष्ठ वेतनश्रेणीवरील चालक वाहकांना खालील प्रमाणे रात्रवस्ती भत्ता दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल.<br><u>ठिकाण</u> <u>दर</u><br>सर्वसाधारण - रु.०९.०० दर रात्रवस्ती मुक्कामाला<br>जिल्हा - रू.११.०० दर रात्रवस्ती मुक्कामाला<br>विर्निदिष्ट - रू.१५.०० दर रात्रवस्ती मुक्कामाला |
| २५ | **रात्र वाहतूक सेवा भत्ता** | रात्र वाहतूक सेवा भत्ता प्रत्येक रात्रीसाठी रू.११.०० या दराने दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल. सदर भत्ता अदा करण्यासाठीच्या शर्ती परिपत्रक क्र.एसटी/ पीडी/६२/एनएस/३/७०दि.३.९.१९७०नुसार असतील. |
| २६ | **रात्रपाळी भत्ता** | जेथे कर्मचा-यांना २१.०० वाजल्यापासून ०६.०० वाजेपर्यन्त किमान तीन तास काम करावे लागेल तेथे अशा कर्मचाऱ्यांना प्रती रात्रपाळी कामासाठी रु.११/- या दराने व २१.०० वाजल्यापासून ०६.०० वाजे पर्यन्त किमान ५.०० तास काम करावे लागते अशा कर्मचाऱ्यांना प्रती रात्रपाळी कामासाठी रु.१३/- या दराने रात्रपाळी भत्ता दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल. |

१२१



| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
| --- | --- | --- |
| २७ | **खोळंबा भत्ता** | जेथे नियत कर्तव्यामुळे चालक-वाहकांना रात्रवस्तीच्या ठिकाणी तेथे पोहोचण्याच्या वेळेपासून १८ तास किंवा त्यापेक्षा अधिक अखंड मुक्काम करणे आवश्यक ठरते अशा ठिकाणासाठी खालील प्रमाणे खोळंबा भत्ता दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल.<br>ठिकाण — दर<br>सर्वसाधारण ठिकाणी — रु.११/- प्रति दिन<br>जिल्हा ठिकाणी — रु.१२/- प्रति दिन<br>विर्निदिष्ट ठिकाणी — रु.२०/- प्रति दिन |
| २८ | **यंत्र भत्ता** | दूरमुद्रक,दूरध्वनीचालक,लिफ्ट चालक,चक्रमुद्रण, यंत्र चालक,फ्रँकींग यंत्र चालक,अमोनिया मुद्रण यंत्र चालक यांना दरमहा रू. ३०/- या दराने,<br>पत्ता यंत्र चालक (अॅड्रेमा), छिद्रांक टंकक,छिद्रांक पडताळक यांना दरमहा रू.३८/- या दराने व<br>यंत्रगणक(कॉम्टिस्ट) यांना दरमहा रू.५३/- या दराने यंत्र भत्ता अदा दि.१.४.२०१२ पासून केला जाईल. |
| २९ | **वाहन भत्ता** | सुरक्षा निरीक्षक/राखण व पहारा निरिक्षक यांना दरमहा रु.३८/- या दराने व<br>सहाय्यक सुरक्षा निरीक्षक यांना दरमहा रु.३०/- या दराने वाहन भत्ता अदा दि.१.४.२०१२ पासून करण्यात येईल. |
| ३० | **रोकड हाताळणी भत्ता** | मध्यवर्ती कार्यालय, प्रादेशिक कार्यालय, विभागीय कार्यालय, मध्यवर्ती कार्यशाळा येथील रोखपालास रू.६०/- दरमहा या दराने रोकड हाताळणी भत्ता दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल. मात्र इमान विम्याचा हप्ता महामंडळ भरेल. |
| ३१ | **रोकड भत्ता**<br>इमान हमी विम्याच्या बदल्यात लिपिक , आरक्षण व पार्सल येथे काम करणारे वाहतूक नियंत्रक तसेच रोकड हाताळणारे वाहतूक नियंत्रक व इतर काम करणाऱ्या यांना रोकड भत्ता देण्यात यावा. | रोकड हाताळणारे कारकून / आरक्षण वाहतूक नियंत्रक/ रोकड हाताळणारे वाहतूक नियंत्रक यांना दरमहा खालील प्रमाणे रोकड भत्ता अदा दि.१.४.२०१२ पासून करण्यात येईल.<br>इमान विम्याची रक्कम — दर<br>रू. ५०००/- — रू.४५/- द.म.<br>रू.१०,०००/- — रू.५३/- द.म.<br>रू.१५,०००/- — रू.७५/- द.म.<br>इमान विम्याचा हप्ता महामंडळ भरेल. |

१२



| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
| --- | --- | --- |
| ३२ | **विशेष भत्ता** (खानसामा व अतिथ्यालय परिचर) | खानसामा व अतिथ्यालय परिचर यांना रू.९०/- दरमहा या दराने विशेष भत्ता दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल. |
| ३३ | **बिघाड दुरुस्ती भत्ता** | बिघाड दुरुस्ती भत्ता रू.९/- प्रति बिघाड या दराने दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल. |
| ३४ | **हजेरी प्रोत्साहन भत्ता** | चालक, वाहक व आगारातील कार्यशाळा कामगारांसाठी दि.२५ एप्रिल ते १२ जून तसेच विभागीय कार्यशाळेसाठी १२ फेब्रुवारी ते ३१ मार्च असा हजेरी प्रोत्साहन भत्त्यासाठी हंगामाचा कालावधी राहील. सदरचा भत्ता जोडपत्र ''ड'' मध्ये दर्शविल्याप्रमाणे दि.१.४.२०१२पासून अदा करण्यात येईल. सदरची प्रोत्साहन योजना रोजंदार गट-१ व गट-२ या कर्मचाऱ्यांनाही लागू राहील. |
| ३५ | **पार्सल भत्ता** | वाहकांना ज्या दिवशी पार्सले घेऊन जावे लागेल त्या दिवशी त्यांना रू.३/- या दराने पार्सल भत्ता दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल. |
| ३६ | **टपाल भत्ता** | वाहकांना ज्या दिवशी टपालाच्या थैल्या घेऊन जावे लागेल त्यादिवशी त्यांना रू.३/- प्रती दिन या दराने टपाल भत्ता दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल. |
| ३७ | **विशेष भत्ता :-** वरिष्ठ रोखपाल, मध्यवर्ती कार्यालय/भांडार,प्रादेशिक कार्यालय,विभागीय कार्यालय,मध्यवर्ती कार्यशाळा येथील सहाय्यक रोखपालास तसेच वरिष्ठ संगणक चालक/सुरक्षा भांडार पर्यवेक्षक/ पर्यवेक्षक/कनिष्ठ सुरक्षा पर्यवेक्षक/ राखण व पहारा निरीक्षक/ प्रमुख द्वारपाल/ कनिष्ठ संगणक चालक यांना दरमहा रु.५००/- प्रमाणे विशेष भत्ता देण्यात यावा. | खालील कर्मचा-यांना पुढील दराने विशेष भत्ता दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल.<br>१) वरिष्ठ रोखपाल(मध्यवर्ती कार्यालय) रु.७५/- द.म.<br>२) मध्यवर्ती भांडार/विभा.कार्यालयातील वरिष्ठ रोखपाल रु.५३/- द.म.<br>३) मध्यवर्ती कार्यशाळेतील दोन रोखपाल रु.५३/- द.म.<br>४) सहाय्यक सुरक्षा निरीक्षक/सुरक्षा निरीक्षक/राखण व पहारा निरिक्षक रु.५३/-द.म.<br>५) वरिष्ठ संगणक चालक रु.१०५/-द.म.<br>६) कनिष्ठ संगणक चालक रु. ६०/- द.म.<br>उपरोक्त १ ते ३ बाबत इमान हमी विम्याच्या रकमेच्या हप्त्याचा खर्च महामंडळ भरेल. |

| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
| --- | --- | --- |
| ३८ | **विशेष वेतन** | १. दि.१.४.२०१२ पासून आगारात काम करणारे सहाय्यक वाहतूक अधिक्षक/वाहतूक निरिक्षक/सहाय्यक वाहतूक निरिक्षक/ वाहतूक नियंत्रक/ लिपिक/ लिपिक- टंकलेखक वरिष्ठ लिपिक/लेखाकार इ. कर्मचा-यांना मूळ वेतनाच्या २०% व जास्तीत जास्त रु.१५०/- दरमहा विशेष वेतन सध्या मिळत आहे,ते दि.१.४.२०१२पासून पुढेही चालू राहील.<br>२. ज्यांना कारखान्याच्या तासाप्रमाणे काम करावे लागते,असे विभागीय कार्यशाळा/मध्यवर्तीकार्यशाळा/टीआरपी येथील कारकूनी कर्मचारीवर्ग व समय लेखापाल तसेच विभागीय भांडारपाल/मध्यवर्ती कार्यशाळेतील सहाय्यक भांडारपाल / भांडार पर्यवेक्षक यांना मूळ वेतनाच्या २०% व जास्तीत जास्त रु.१५०/-दरमहा विशेष वेतन सध्या मिळत आहे,ते दि.१.४.२०१२पासून पुढेही चालू राहील. |
| ३९ | **संरक्षित महागाई भत्ता** | १.ज्या कर्मचा-यांना दि.३१.३.२०१२ रोजी सन १९८९ च्या करारानुसार मिळत असलेला संरक्षित महागाई भत्ता प्रत्यक्ष मिळत होता,त्यांच्या बाबतीत तो विशेष वेतन अनुज्ञेय असलेल्या कामाच्या ठिकाणी कार्यरत असे पर्यन्त प्रचलीत नियमानुसार चालू राहील.<br>२.ज्या कर्मचा-यांना दि.३१.३.१९९६रोजी मिळत असलेला संरक्षित महागाई भत्ता रु.२२२/- इतकी रक्कम दि.१.४.२०१२ पासून त्या कर्मचा-यास देय राहील. तथापि, सदरचा संरक्षित महागाई भत्ता तो कर्मचारी विशेष वेतन अनुज्ञेय असलेल्या कामाच्या ठिकाणी किंवा त्या पदावर कार्यरत असेपर्यन्त देय राहील.तसेच अशा कर्मचाऱ्यांची बदली २०% विशेष वेतन अनुज्ञेय नसलेल्या कामाच्या ठिकाणी झाली तर त्यांना सदरचा संरक्षित महागाई भत्ता देय होणार नाही. मात्र अशा कर्मचाऱ्यांची बदली पुन्हा २०% विशेष वेतन अनुज्ञेय आहे अशा कामाच्या ठिकाणी झाली तर त्यांना पुर्वी मिळत असलेला संरक्षित महागाई भत्ता रू.२२२/- देय राहिल. तसेच संरक्षित महागाई भत्ता रू.२२२/- अनुज्ञेय असलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित / तात्पुरती बढती दिल्यास व या बढतीच्या पदास अनुज्ञेय असल्यास त्यांना सदरचा संरक्षित महागाई भत्ता मिळण्यास ते कर्मचारी २०% विशेष वेतन अनुज्ञेय असलेल्या कामाच्या ठिकाणी कार्यरत असेपर्यंत देय राहील. |

१७५



| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| ४० | **वैद्यकीय भत्ता** | ज्या कर्मचा-यांनी वैद्यकीय भत्याचा पर्याय स्वीकारला आहे, त्यांना दि. १.४.२०१२ पासून दरमहा रु.५३/- वैद्यकीय भत्ता अदा करण्यात येईल.<br><br>नवीन सेवेत लागणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत वैद्यकीय भत्ता किंवा वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा पर्याय स्वीकारण्याची मुभा राहील. ज्या कर्मचा-यांनी वैद्यकीय प्रतिपूर्तीचा पर्याय स्वीकारलेला आहे किंवा स्वीकारतील अशा कर्मचा-यांना वैद्यकीय भत्याचा पर्याय स्वीकारता येणार नाही.<br><br>कनिष्ठ वेतनश्रेणीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सदरचा वैद्यकीय भत्ता एक वर्षापर्यंत देय राहील. त्यानंतर अशा कर्मचाऱ्यांना वैद्यकीय भत्यावरुन वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा पर्याय निवडण्याची मुभा राहील.<br><br>रुग्णालयीन उपचारासहीत वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची योजना अधिक व्यापक केल्याच्या परिणामी वैद्यकीय भत्त्याऐवजी वैद्यकीय सवलतीचा पर्याय स्वेच्छेने निवडण्याची मुभा देण्यात येईल. |
| ४१ | **उत्सव अग्रिम** | राज्य शासनाच्या धर्तीवर उत्सव अग्रिम अदा करण्यात येईल व सदर उत्सव अग्रिमाची वसूली समान १० हप्त्यात करण्यात येईल. |
| ४२ | रा.प.कर्मचारी दुर्दैवाने अपघातात सापडल्यास त्यांना चालक/वाहका प्रमाणे वैद्यकिय खर्चाकरीता तातडीने उचल देण्यात यावी. | कामगिरीवर असताना हृदयविकाराचा झटका आल्यास, अपघातात गंभीर जखमी झाल्यास अशा कर्मचा-यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यास रू.१०,०००/- ऐवजी रु.८०,०००/- पर्यंत अग्रिम रक्कम देण्यात येईल. सदरची अग्रिम रक्कम कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय देयकातून वळती करुन, उर्वरीत रक्कम कर्मचाऱ्यास अदा करण्यात येईल. |
| ४३ | विभागीय भांडार / आगारातील डिझेल पंप येथे नेमलेल्या सहाय्यक ऐवजी अर्धवेळ कर्मचारी यांना पूर्णवेळ वेतनावर घेऊन त्यांची त्या कामासाठी नेमणूक करण्यात यावी. | दि.१.४.२०१२ रोजी जे अर्धवेळ कामगार सेवेत आहेत अशा सर्व अर्धवेळ कामगारांना पुर्णवेळ करण्यात येईल. |

175



| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| ४४ | सर्व रा.प.कर्मचा-यांना महामंडळाने ओळखपत्रे द्यावीत. | सर्व रा.प.कामगारांना स्मार्ट कार्डसारखे ओळखपत्र मोफत देण्यात येईल. |
| ४५ | स्वच्छक व मजदूर यांना बढती पदाकरीता १५ वर्षाची सेवा झाल्यानंतर प्रशिक्षण देऊन बढती देणे | मजदूर व स्वच्छक या पदावर काम करणा-या कर्मचा-यांची दि.३१.३.२०१२रोजी व तद्नंतर १२ वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर अशा कर्मचाऱ्यांना सहाय्यक पदावर नेमणूक देण्याच्या अनुषंगाने त्यांना ६ महिन्याचे प्रशिक्षण देण्यात येईल व त्यांची प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात येईल. जे कर्मचारी अशी परिक्षा उत्तीर्ण होतील त्यांना पदांच्या उपलब्धतेनुसार सहाय्यक, टायर फिटर या पदी बढती देण्यात येईल. प्रात्यक्षिक परिक्षेचे स्वरुप मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करुन ठरविण्यात येईल. |
| ४६ | मान्यताप्राप्त कामगार संघटनेच्या प्रादेशिक सचिव, विभागीय सचिव यांना आगार व विभागीय पातळीवरील कामगार प्रश्न सोडविण्याकरीता दरमहा विशेष नैमित्तिक रजा ७ ते १० दिवस देण्यात यावी.(शासन निर्णय आरजीए-१०९५/ ११/ प्रक्र-२/ ९५ह१६-ब) आरजीए१०८४/२९०६/सी.आर./ २०/१६-अ दि.१८ डिसेंबर १९८५.) | मान्यताप्राप्त संघटनेच्या ३० विभागीय सचिव व ६ प्रादेशिक सचिव अशा एकूण ३६ पदाधिकाऱ्यांना त्यांच्या संघटनेच्या कामासाठी कमाल ५ दिवस विशेष रजा दरवर्षी देण्यात येईल. |
| ४७ | मान्यताप्राप्त संघटनेच्या पदाधिकाऱ्यां विरुध्द कोणतीही कारवाई करण्यापूर्वी मान्यताप्राप्त संघटनेच्या अध्यक्ष / जनरल सेक्रेटरी यांना विश्वासात घेऊन चर्चा केल्यानंतरच उभयपक्षी मान्य झालेलीच कारवाई करावी. | १९९६-२००० च्या कामगार करारातील कलम १११ ची अंमलबजावणी करण्याबाबत परिपत्रकीय सूचना प्रसारीत करण्यात येतील. |
| ४८ | मान्यताप्राप्त संघटनेच्या मागणीप्रमाणे सभासदांची वार्षिक वर्गणी व कोणत्याही स्वरुपाचा निधी त्यांचे वेतनातून/ फरकातून वसुल करुन संघटनेकडे ३ दिवसाचे आत वर्ग करावी. | मान्यताप्राप्त संघटनेच्या सभासदांची वार्षिक वर्गणी कर्मचा-यांच्या लेखी संमतीने पगारातून कपात करुन मान्यताप्राप्त संघटनेकडे वर्ग करण्यात येईल. |

१७८



| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| ४९ | महामंडळाच्या कार्यक्रमास मान्यताप्राप्त संघटनेच्या डेपो अध्यक्ष / डेपो सचिव / विभागीय अध्यक्ष/ विभागीय सचिव/ राज्यस्तरीय अध्यक्ष / जनरल सेक्रेटरी यांना कार्यालयीन वेळ देऊन कार्यक्रमास आमंत्रित करुन कार्यक्रमात सहभाग देण्यात यावा. | कामगारांशी संबंधीत कार्यक्रमात मान्यताप्राप्त संघटनेचा सक्रिय सहभाग राहील व अशा कार्यक्रमाच्या वेळी मान्यताप्राप्त संघटनेच्या प्रतिनिधीस बोलण्याची संधी देण्यात येईल. |
| ५० | मान्यताप्राप्त संघटनेच्या फलकावर मजकूर लिहिण्यापूर्वी पूर्व परवानगी घेण्याची अट रद्द करण्यात यावी. | मान्यताप्राप्त संघटनेच्या फलकावर मजकूर लिहिण्यापूर्वी पूर्व परवानगी घेण्याची अट रद्द करण्यात येईल. मात्र संघटनेच्या नोटीस बोर्डवर कामगारांमध्ये प्रक्षोभ निर्माण होऊन औद्योगिक संबंध बिघडतील असा कोणताही आक्षेपार्ह मजकूर लिहिलेला असेल तर सदरच्या नोटीस बोर्डावरील मजकूर ताबडतोब काढण्याबाबत प्रशासनातर्फे संघटनेला सूचना देण्यात येतील. |
| ५१ | दि.१.४.२०१२ ते दि.३१.३.२०१६ पर्यंतच्या करारातील काही त्रुटी, विसंगती करारावर सहया झाल्यावर अंमलबजावणी करताना निर्माण झाल्यास त्या त्वरीत दुरुस्त करण्यात याव्यात. | कामगार करार अंमलबजावणीच्या अनुषंगाने वाद असल्यास तो "वाद निवारण समिती" (Dispute Redressal Committee) कडे सोपविण्यात येईल. |
| ५२ | सेवानिवृत्त/स्वेच्छा निवृत्त कर्मचा-यांच्या वारसास त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रा.प.सेवेत घेण्यात यावे. त्यासाठी सरळ सेवेतील २५ टक्के जागा राखीव ठेवाव्यात. | सरळसेवेच्या भरती वेळी कर्मचा-यांच्या वारसांना नोकरीत घेताना "प्रथम प्राधान्य (First Priority) देण्यात येईल". |
| ५३ | कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास खास रजा देताना कायम वेतनश्रेणीची अट रद्द करावी व सदरची रजा सर्व कर्मचा-यांना देण्यात यावी. | कर्मचाऱ्याने किंवा त्याच्या पत्नीने/पतीने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली असल्यास अशा कर्मचाऱ्याला राज्य शासनाच्या कर्मचाऱ्याप्रमाणे खास रजा व कुटुंब नियोजन सवलतीचे फायदे देण्यात येतील. अशी खास रजा व सवलतीचे फायदे देताना कायम वेतनश्रेणीची अट रद्द करण्यात येईल. |

१२२



| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| ५४ | चालक/वाहक तसेच कोणताही कर्मचारी त्यांचे ते काम करण्यास अपात्र ठरले तर ते करु शकतील अशा स्वरुपाचे कमी कष्टाचे कमी जबाबदारीचे काम देण्यात यावे. सदर बाब स्थानिक पातळीवर करण्यात यावी. चालकास सेवाजेष्ठते प्रमाणे बी.ई.एस.टी.प्रमाणे लाईन चेकींगसाठी वापरण्यात यावे. | बीईएसटीच्या धर्तीवर चालकांच्या उपलब्धते नुसार व सेवा जेष्ठतेप्रमाणे लाईन चेकींगचे काम करण्याकरीता त्यांना सीटीआय, भोसरी, पुणे येथे प्रशिक्षण देऊन , त्यांच्याकडून आवश्यकतेनुसार लाईन चेकींगचे काम करुन घेण्याबाबत सकारात्मक विचार करून विशेष योजना तयार करण्यात येईल. |
| ५५ | संचारबंदी, नैसर्गिक आपत्ती, सार्वजनिक आंदोलने, बंदसारखे प्रकार घडल्यास कर्मचा-यांना नियोजित कर्तव्यावर येणे-जाणे अशक्य झाल्यास, सदर कालावधीचा काळ उपस्थितीत धरावा. तसेच कोणत्याही आंदोलनामुळे महामंडळाचे कामकाज बंद झाल्यास उपस्थित असणा-या कर्मचा-यांना हजेरी देण्यात यावी (चालक/वाहकसहीत) | संचारबंदी, नैसर्गिक आपत्ती, सार्वजनिक आंदोलने, बंदसारखे प्रकार घडल्यास अशा प्रसंगी प्रशासनाने प्रवाशी वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेतला असेल अशा वेळी जे चालक-वाहक नियोजित कर्तव्यावर हजर असतील त्यांना त्या दिवसाची हजेरी देण्यात येईल. मात्र अशा चालक-वाहकांनी त्यांची ड्युटी संपेपर्यंत कामाच्या ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. |
| ५६ | वाहकांना कामगिरीवर जाण्यापूर्वी रु.५००/- अग्रीम रक्कम देण्यात यावा. | सध्या वाहकांना कर्तव्यावर जाताना दहा रुपये सुट्टे देण्याची तरतुद आहे. त्याऐवजी रु.१००/- इतकी रक्कम वाहकांना अग्रधन देण्यात येईल. गरज भासल्यास सदर रक्कमेमधून टोलसाठी वाहकांना खर्च करता येईल. |
| ५७ | घर बांधणी अग्रिम, शैक्षणिक कर्ज कमी व्याज दराने उपलब्ध करुन द्यावे. | घरबांधणी अग्रिम राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे अदा करण्यात येईल. |
| ५८ | मोफत पास अंशकालिन, रोजंदार गट क्र.१ व २, कनिष्ठ व संकलित वेतनावर काम करणा-या कर्मचा-यांना ते हजर झालेल्या तारखेपासून देण्यात यावा. | १८० दिवस भरल्यानंतर लगेच मोफत पास देण्याच्या मागणीबाबत व्यवस्थापनाचे दोन प्रतिनिधी व संघटनेचे दोन प्रतिनिधी यांची समिती नेमण्यात येईल. सदर समितीने सादर केलेल्या अहवालावर निर्णय घेण्यात येईल. |
| ५९ | मध्यवर्ती कार्यशाळा, विभागीय कार्यशाळा, विभाग , आगार स्तरावरील मानसेवी अधिकारी हे पूर्णवेळ व मिश्रक पूर्णवेळ असावेत व आगार पातळीवर मानसेवी अधिकारी, मिश्रक अर्धवेळ नेमावेत. | रा.प.दवाखान्यामध्ये ब्लड प्रेशर व ब्लड शुगर टेस्ट करण्याचे मशीन ठेवण्यात येईल.<br><br>मध्यवर्ती कार्यालयातील दवाखान्यामध्ये मंजूर असलेल्या सह मुख्य वैद्यकीय अधिकारी या पुर्णवेळ पदावर नेमणूक करण्यात येईल. सह मुख्य वैद्यकीय अधिकारी यांची पुर्णवेळ पदी नेमणूक केल्यानंतर त्यांच्या सल्ल्यानुसार आवश्यक ती साधन सामुग्री उपलब्ध करुन देण्यात येईल |

| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| ६० | ज्या चालकांची ह्यदय शस्त्रक्रिया झालेली आहे अशा चालकाना हलके काम देण्यात यावे. | ज्या चालकांची ह्यदय शस्त्रक्रिया झालेली आहे अशा चालकाना दोन महिन्यासाठी हलके काम देण्यात येईल. |
| ६१ | कर्मचारी व त्यांचे कुटुंबियास गंभीर आजार/ अपघात झाल्यास किंवा निधन झाल्यास अशा प्रसंगी निवासस्थान ते दवाखाना व परत किंवा राहत्या गावापर्यंत जाण्याकरीता मोफत रुग्णवाहिकेची सोय महामंडळाने करावी व अशी रुग्णवाहिका उपलब्ध नसेल तर खाजगी रुग्णवाहिकेचे बाजार भावाप्रमाणे भाडे महामंडळाने विनाअट अदा करावे. | कर्मचारी कामगिरीवर असताना अपघातामध्ये गंभीर जखमी झाल्यास किंवा निधन झाल्यास अशा प्रसंगी रुग्णवाहिका/शववाहिनी मोफत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने व्यवस्थापनातर्फे कार्यवाही करण्यात येईल. |
| ६२ | महामंडळाने धोरणात्मक निर्णय घेताना मान्यताप्राप्त संघटना प्रतिनिधींना विश्वासात घेऊन सल्ला मसलत करुन उभयपक्षी मान्य झाल्यावरच त्याची अंमलबजावणी करावी. | कामगार प्रश्नांवर जेथे आवश्यकता असेल तेथे मान्यताप्राप्त संघटनेशी सल्लामसलत करण्यात येईल. |
| ६३ | २५ वर्षे विना अपघात सेवा केलेल्या चालकांना पूर्वीप्रमाणे चालक प्रशिक्षक म्हणून नेमणूक देण्यात यावी. | २५ वर्षे विना अपघात सेवा केलेल्या चालकांना ''चालक प्रशिक्षक'' म्हणून नेमणूक करण्यासाठी चालक प्रशिक्षक पद निर्माण करण्यासाठी संचालक मंडळाचा ठराव करून मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात येईल. |
| ६४ | विना अपघात सेवा देणाऱ्या चालक कर्मचा-यांकरीता खालीलप्रमाणे बक्षिस योजना देण्यात याव्यात.<br>(अ)५ वर्षे विना अपघात सेवा-बक्षिस रक्कम रु.१०,०००/-<br>(ब)१०वर्षे विना अपघात सेवा-बक्षिस रक्कम रु.१५,०००/-<br>(क)१५ वर्षे विना अपघात सेवा-बक्षिस रक्कम रु.२०,०००/-<br>(ड)२० वर्षे विना अपघात सेवा-बक्षिस रक्कम रु.२५,०००/-<br>(इ)२५ वर्षे विना अपघात सेवा-बक्षिस रक्कम रु.३०,०००/-<br>तसेच प्रत्येक वर्षासाठी रु.१०००/- बक्षिस देण्यात यावे. | १. विना अपघात सेवा करणा-या चालकांची एक वर्षापर्यंत २६० दिवस विना अपघात सेवा झाल्यास अशा चालकांना रु.१०००/- बक्षिसाची रक्कम दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल.<br>२. एक वर्षानंतर परंतु दोन वर्षाच्या आत २६० दिवस विना अपघात सेवा झाल्यास अशा चालकांना रु.६००/- बक्षिसाची रक्कम दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल.<br>३. २५ वर्षे व त्यापेक्षा जास्त विना अपघात सेवा झाल्यास अशा चालकांना रु.१४०००/- बक्षिसाची रक्कम दि.१.४.२०१२ पासून अदा करण्यात येईल. अशा चालकांच्या सत्कार प्रसंगी त्यांच्या पत्नीला दर्जेदार साडी देण्यात येईल. |

179



| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| ६५ | मार्गस्थ बस मार्गावर पंक्चर झाल्यास अथवा टायरचे नुकसान झाल्यास रा.प.चालकास जबाबदार धरण्यात येऊ नये व त्यांचकडून कोणतीही नुकसान भरपाई वसुली करण्यात येऊ नये. | मार्गस्थ बस मार्गावर पुढील टायर पंक्चर होऊन टायरचे नुकसान झाल्यास आणि तसे चौकशीअंती निष्पन्न झाल्यास चालकास जबाबदार धरले जाणार नाही. प्रत्येक गाडीवर जॅक देण्याची व्यवस्था करण्यात येईल. |
| ६६ | सध्याच्या रस्त्यांची मार्गावरील वाहनांची अडथळयांची / विनंती थांब्यांची निश्चिती करुन, रेल्वे फाटक, टोल टॅक्स्, इंधन भरणे, बायपास सिंग्नल व हात दाखवून गाडी उभी करण्याच्या थांब्यांची या इत्यादी व अन्य परिस्थितीची सर्व मार्गाची मान्यताप्राप्त संघटनेच्या प्रतिनिधीसमवेत धाववेळेची फेरतपासणी प्रवासी बसमधून करण्यात यावी व उभयपक्षी मान्य केलेली धाववेळच निश्चित करण्यात यावी. तसेच नवीन मार्गावर नियते सुरु करण्यापूर्वी वरीलप्रमाणे पूर्तता करुनच नियते सुरु करावीत. | धाववेळेबाबत जेथे तक्रार असेल त्या मार्गाबाबतच व नविन मार्ग (रुट) असेल त्या ठिकाणी प्रवाशी बसमध्ये GPS Device लावून व्यवस्थापनाचा प्रतिनिधी व मान्यताप्राप्त संघटना प्रतिनिधी यांच्यासह सर्वेक्षण (Survey) करण्यात येईल व GPS Device मध्ये दर्शविलेली धाववेळ उभयपक्षी मान्य करुन त्यावर दोन महिन्यात कार्यवाही करण्यात येईल. |
| ६७ | वाहकाचा तिकिट ट्रे व ई.टी.आय.एम.मशिन चोरीस गेल्यास अथवा तिकिट पुस्तके गहाळ झाल्यास अशा वाहकाकडून संपूर्ण तिकिटाची रक्कम व ई.टी.आय.एम.मशिनची वसुली करु नये व त्यासाठी वाहकास आरोपपत्र देऊ नये. | नैसर्गिक आपत्तीमुळे व अपघातामध्ये वाहकांचा मृत्यू झाल्यामुळे वाहकांचा तिकिट ट्रे/ई.टी.आय.एम.मशिन गहाळ झाल्यास अशा वेळी वाहकांकडून तिकिट ट्रे/ ई.टी.आय.एम. मशिनची वसूली केली जाणार नाही. इतर प्रसंगी वाहकाचा तिकिट ट्रे/ ई.टी.आय.एम.मशिन गहाळ झाल्यास प्रकरणांचे गांभीर्य पाहून किती किंमत वसूल करावी यांचा निर्णय घेण्याचे १९९६-२००० च्या कामगार करारान्वये मान्य केलेले आहे त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. तसेच वाहकांचा गहाळ झालेला तिकिट ट्रे/ ई.टी.आय.एम. मशिन परत सापडल्यास वाहकांकडून वसूल केलेली रक्कम त्यांना ८ दिवसात परत केली जाईल. |

१८०



| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| ६८ | चालक/कार्यशाळा कर्मचारी यांच्या प्राणांतिक गंभीर अपघाताप्रकरणी कोर्टात जामीन देण्याबाबत रोख रक्कम प्रशासनाने भरुन चालकास/ कार्यशाळा कर्मचा-यास जामीन द्यावा. | चालक नियोजित कर्तव्यावर असताना त्यांच्याकडून अपघात झाल्यास व संबंधीतावर न्यायालयात खटला दाखल झाल्यास रू.२०००/- अग्रिम देण्याचे व त्याची वसूली समान १० हप्त्यात करण्याचे, तसेच अशा अपघाताच्या वेळी चालकास ज्याप्रमाणे पोलीस स्टेशनमध्ये व्यवस्थापनातर्फे जामीन दिला जातो, त्याच धर्तीवर न्यायालयातही महामंडळातर्फे जामीन देण्याचे सन २००४-२००८ च्या कामगार करारामध्ये मान्य केलेले आहे त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. त्याचप्रमाणे इतर राज्यामध्ये म.रा.मा.प.बसला अपघात झाल्यास अशा वेळी चालकांच्या जामीनापोटी महामंडळातर्फे रू.२५०००/- पर्यंत रोखीने भरण्याबाबतच्या परिपत्रकीय सूचना प्रसारीत केलेल्या आहेत त्याचीही अंमलबजावणी करण्यात येईल. |
| ६९ | राज्याबाहेर ज्या ठिकाणी महामंडळाच्या रा.प.बसेस रात्रवस्तीसाठी जातात अशा ठिकाणी चालक/वाहक यांना स्वतंत्र विश्रांतीगृहाची व्यवस्था करावी. अन्यथा बाजारभावाप्रमाणे भत्ता अदा करावा. | आंतरराज्य बसेसच्या रात्रवस्तीच्या ठिकाणी चालक/वाहकांसाठी विश्रांतीगृह म्हणून एक स्वतंत्र रुम उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर रुम मध्ये दिवे व पंख्याची सोय करण्यात येईल. |
| ७० | रा.प.महामंडळाच्या बसमधील डिझेलचोरी प्रकरणी चालकास जबाबदार धरु नये. तसेच सर्व बसेसचा विमा महामंडळाने उतरविला असल्याने तसेच रा.प.महामंडळाच्या हद्दीबाहेर रा.प.बसचे अन्य कोणत्याही कर्मचा-याकडून वसुल करु नये. डिझल जास्त लागले म्हणून चालकाकडून डिझेलची वसुली करण्यात येऊ नये. | बसमधील डिझेल चोरी प्रकरणी चौकशी करुन, चौकशीअंती चालक जबाबदार असेल तर कारवाई केली जाईल. त्याचप्रमाणे डिझेल टाकीच्या कॅपला कुलुप लावण्याच्या सूचना आहेत त्याची अंमलबजावणी करण्याबाबत पुन्हा सूचना प्रसारीत करण्यात येतील. |
| ७१ | वाहकाच्या सीटला आसन क्रमांक देण्यात यावा. | वाहकांच्या सीटला आसन क्रमांक देण्यात येईल. |
| ७२ | सर्व आगारामध्ये नोटा तपासण्याचे व मोजण्याचे मशिन पुरविण्यात यावे. तसेच (संगणकीकरण) करण्यात यावे. | मुंबई, परळ, ठाणे, पनवेल, नाशिक इत्यादी १० मोठ्या आगारांना नोटा तपासण्याचे व मोजण्याचे मशिन प्रायोगिक तत्वावर पुरविण्यात येईल.<br><br>त्यानंतर आवश्यकता विचारात घेऊन इतर आगारांना पुरविण्याबाबत विचार करण्यात येईल. |

| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| ७३ | कर्मचा-यांची निवडश्रेणी वार्षिक वेतन पुढील ६ महिन्याच्या कालावधीत येत असेल तर बढतीवरील वेतन निश्चिती करताना निवडदर्जा/श्रेणीनंतर करावी. सदर बाब नियमितप्रमाणे तात्पुरत्या बढतीसही लागू करावी. | जे कर्मचारी निवडश्रेणीसाठी/ श्रेणीकरणासाठी पात्र ठरतील अशा कर्मचाऱ्यांची वार्षिक वेतनवाढ निवडश्रेणीच्या/ श्रेणीकरणाच्या तारखे नंतर ६ महिन्यापर्यंत येत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना देय तारखेस प्रथम वार्षिक वेतनवाढ देऊन नंतर निवडश्रेणीवर/ श्रेणीकरणावर वेतन निश्चिती करण्यात येईल. निवडश्रेणीवर/ श्रेणीकरणावर वेतन निश्चिती करण्यापुर्वी अशा कर्मचाऱ्याकडून लेखी पर्याय एक महिन्याच्या आत घेणे अनिवार्य राहील. याबाबत प्रसारीत करण्यात येणाऱ्या विभागीय आस्थापना आदेशात तसे नमूद करण्यात येईल.<br>तात्पुरत्या बढतीसाठी असा पर्याय लागू होणार नाही. मात्र तात्पुरत्या बढतीवर असतानाच सदरच्या कर्मचाऱ्याला नियमित बढती मिळाली तर त्यावेळी संबंधीत कर्मचाऱ्यां-कडून एक महिन्यात पर्याय घेणे अनिवार्य राहील. |
| ७४ | ए.टी.एस./ ए.डब्ल्यु.एस./ सिनियर फोरमन/ आस्था. पर्यवेक्षक/ विभागीय लेखाकार इत्यादी कर्मचा-यांना निवडश्रेणी देण्यात यावी. | स.वा.अ./स.का.अ./वरिष्ठ कार्यदेशक /भांडार पर्यवेक्षक/ कार्यालय अधिक्षक/ विभा.लेखाकार/ शाखा अभियंता/ आरेखक / वरिष्ठ संगणक चालक/आधार सामुग्री संस्करण अधिक्षक (Data processing supdt.) /वरिष्ठ संग्रह पडताळक/ विधी अधिक्षक /लघुलेखक (वरिष्ठ) या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी एकाच वेतनश्रेणीत सलग १२ वर्षे सेवा पूर्ण केलेली असेल अशा कर्मचाऱ्यांना श्रेणीकरण दि.१.४.२०१२ पासून अनुज्ञेय राहील. मात्र असे कर्मचारी १.४.२०१२पुर्वी पात्र झालेले असतील अशा कर्मचाऱ्यांना दि.१.४.२०१२ पासून श्रेणीकरणाचा लाभ देय राहील. |
| ७५ | मदतनीस (सहाय्यक) सहाय्यक कारागीर या पदातील कर्मचा-यांना निवडश्रेणी देताना तात्पुरत्या बढतीचा कालावधी ग्राहय धरण्यात यावा. | तात्पुरत्या बढतीचा कालावधी निवडश्रेणी मंजूर करताना ग्राहय धरण्यात येईल. तसेच, एखादा कर्मचारी तात्पुरत्या बढतीवर असताना त्याच पदावर नियमित पदोन्नत झाला असेल, अशा कर्मचा-याच्या बाबतीत तात्पुरत्या बढतीचा कालावधी वरच्या पदाची निवडश्रेणी मंजूर करताना ग्राहय धरण्यात येईल असे सन १९९६-२००० च्या कामगार करारात मान्य केलेले आहे. सदर तरतूदीच्या अनुषंगाने कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक (पी.डी.सी.) प्रसारीत करण्यात येईल. |

| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| ७६ | राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे एकाच पदात सलग २० वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यास दुसरी निवडश्रेणी मंजूर करण्यात यावी. | दि.१.४.२०१२रोजी व तद्नंतर जे कर्मचारी त्यांच्या विद्यमान वेतनश्रेणीत १२ वर्षाची अखंड सेवा पूर्ण करीत असतील अशा कर्मचाऱ्यांना निकट वरच्या बढतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत ३%ची एक वेतनवाढ देऊन वेतननिश्चती करण्यात येईल.तसेच १२ वर्षानंतर त्यांच्या विद्यमान वेतनश्रेणीत पुन्हा १२ वर्षाची (एकूण २४ वर्षाची सेवा) अखंड सेवा पूर्ण करीत असतील अशा कर्मचाऱ्यांना निकट वरच्या बढतीच्या पदाची वेतनश्रेणीत ३% ची एक वेतनवाढ देऊन वेतननिश्चती करण्यात येईल. मात्र सदर कालावधीत बढती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना सदरची तरतूद लागू होणार नाही.तसेच जे कर्मचारी अशा श्रेणीकरणास दि.१.४.२०१२पुर्वी पात्र झालेले असतील अशा कर्मचाऱ्यांना दि.१.४.२०१२ पासून श्रेणीकरणाचे लाभ देय राहील. |
| ७७ | दि.२०.१२.१९९६ च्या शासन निर्णयानुसार अनुकंपा तत्वावर अवलंबितास नोकरी देताना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वर्ग ३ व ४ मधील कोणत्याही पदात सामावून घेण्यात यावे व त्यांना रा.प.सेवेत रुजू झाल्यापासून नियमित वेतनश्रेणीत घेण्यात यावे. | शासनाप्रमाणे वर्ग-क व ड मधील पदी अनुकंपा तत्वावर नेमणूका दिल्या जातात. त्याच धर्तीवर रा.प.महामंडळातील वर्ग-३ व वर्ग-४ पदामध्ये उमेदवाराच्या शैक्षणिक अर्हतेनुसार अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्यात येईल. |
| ७८ | खात्यामार्फत पदोन्नती व निवडश्रेणी करीता कनिष्ठ वेतनश्रेणीचा कालावधी ग्राहय धरण्यात यावा. | कनिष्ठ वेतनश्रेणीचा कालावधी खात्यामार्फत पदोन्नती व निवडश्रेणी देताना ग्राहय धरण्यात येईल. |
| ७९ | शासन निर्णयानुसार १२ वर्ष सेवा पूर्ण झाल्यावर वरिष्ठ पदाची बढती विनाअट देण्यात यावी. | बढती परिक्षेची सध्यस्थितीत चालू असलेली पध्दत योग्य आहे. परंतु कर्मचाऱ्याने मागणी केल्यास,परिक्षेत नापास झालेल्या उमेदवारास अपील करता येईल याकरीता सह व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन, समितीमध्ये महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) व ज्या पदाची परिक्षा घेतली आहे, त्या संबंधीत खात्याचे महाव्यवस्थापक हे समितीचे सदस्य असतील. ही समिती अपिलावर निर्णय घेईल. ज्यावेळी सह व्यवस्थापकीय संचालक यांचे पद रिक्त असेल त्यावेळी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक हे सदर समितीचे अध्यक्ष राहतील. |

123



| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| ८० | कार्यशाळा कामगारांना दोन वर्षाला फूल साईज जर्सी/स्त्री कामगारांना स्वेटर देण्यात यावे. | कामगार करार १९९६-२००० च्या कलम २६(५) नुसार वाहतूक नियंत्रक/वाहतूक निरिक्षक व सफाई कामगारांना तीन वर्षातून एकदा, कार्यशाळेतील कारखान्याचे कर्मचारी, शिपाई, नाईक, हवालदार आणि लिफ्ट चालक यांना चार वर्षातून एकदा वुलन जर्सी विनामुल्य देण्याचे मान्य केलेले आहे. त्यास अनुसरुन वरील पदामध्ये कार्यरत असलेल्या स्त्री कर्मचा-यांनाही वूलनजर्सी देण्यात येईल. |
| ८१ | चालक/वाहक यांना मुक्कामाच्या ठिकाणी झोपण्यासाठी योग्य त्या सिट बसविण्यात याव्यात. (पूर्वीप्रमाणे सहा सिटर) | चालक/वाहक यांना मुक्कामाच्या ठिकाणी झोपण्यासाठी नवीन तसेच आर.सी. पासींगच्यावेळी बसेसमध्ये योग्य त्या सिट बसविण्यात (पूर्वीप्रमाणे सहा सिटर) येतील. |
| ८२ | महिला कामगारांना प्रसुती रजा, गर्भपाताची रजा देताना १ वर्षे सेवेची अट शिथिल करावी. तसेच महिला कर्मचा-यांना प्रसुती रजा, गर्भपाताची रजा, कुटुंब नियोजनाची खास रजा शासन निर्णयाच्या तारखेपासून देण्यात यावी. | महिला कर्मचा-यांना प्रसुती रजा, गर्भपाताची रजा, कुटुंब नियोजनाची खास रजा शासन निर्णयानुसार व त्या तारखेपासून देण्यात येईल. |
| ८३ | महिला वाहक व सहाय्यक यांना गरोदरपणाच्या काळात लाईट डयुटी अथवा टेबलवर्क देण्यात यावे | महिला वाहकांना गरोदरपणाच्या काळात लाईट डयुटी किंवा टेबलवर्क देण्याचा निर्णय घेण्याकरीता अभ्यासगट नेमण्यात येईल. यामध्ये महाव्यवस्थापक (क.व औ.सं.), महाव्यवस्थापक (वाहतूक) व मान्यताप्राप्त संघटनेच्या महिला वाहक प्रतिनिधींचा समावेश असेल. |
| ८४ | प्रसुतीनंतर कामावर हजर झालेल्या महिला कर्मचा-यास स्तनपानासाठी वेळ राखून ठेवावा. | सदरची मागणी तत्वत: मान्य करण्यात येत आहे. |
| ८५ | महिला कर्मचा-यांना कामाच्या ठिकाणी स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी इत्यादी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. | महिला कर्मचा-यांना कामाच्या ठिकाणी स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी इत्यादी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील. |

(१८)



| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
| --- | --- | --- |
| ८६ | लैंगिक छळ प्रतिबंधनात्मक समितीची विभागवार स्थापना करुन यात मान्यताप्राप्त संघटनेच्या महिला सदस्यांना प्रतिनिधीत्व देण्यात यावे. | प्रत्येक विभागामध्ये लैंगिक छळ प्रतिबंधात्मक समितीची स्थापना करण्यात येईल. |
| ८७ | लैंगिक छळ प्रकरणातील कामकाजाच्या पध्दतीबाबत सर्व विभागांना अवगत करावे. सदरचे परिपत्रक व सदर समितीच्या कार्यपध्दतीबाबत सर्व स्तरावर जागृती करावी. | महिला लैंगिक छळ प्रतिबंधात्मक समिती स्थापन करण्यात आल्याबाबत सर्व स्त्री कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणण्याकरीता सर्व विभागांना परिपत्रकीय सूचना प्रसारीत करण्यात येतील. |
| ८८ | महिला वाहकावर व इतर महिला कामगारांवर प्रवाशांकडून प्राणांतिक हल्ले, छेडाछेड, शिवीगाळ, धमक्या इत्यादी प्रकार होत असतात. अशा वेळी ठोस प्रतिबंधात्मक तरतुदीचे आयोजन करावे. | महिला कर्मचा-यांवर प्रवाशांकडून हल्ले, छेडछाड, शिवीगाळ, धमक्या इ. प्रकार होत असतील तर अशा बाबी प्रशासनाच्या निदर्शनास आणाव्यात. याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येईल. |
| ८९ | महिला कामगारांनी स्वत: कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास किमान १५ दिबसाची विशेष रजा द्यावी. | कुटूंब नियोजनाच्या शस्त्रक्रियेच्या रजेबाबत शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. |
| ९० | महिला कर्मचा-यांना कामाची वेळ सकाळी ६.०० ते सध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत असावी. रात्रवस्तीच्या कामगि-या महिला वाहकांना लावण्यात येऊ नयेत. | महिला कर्मचा-यांकडून कायद्याच्या तरतुदीनुसार कामगिरी करून घेण्यात येईल. महिलांच्या प्रश्नांकरीता दर तीन महिन्यांनी सह व्यवस्थापकीय संचालक यांचे अध्यक्षतेखाली महाव्यवस्थापक(क.व औ.सं.) व मुख्य कामगार अधिकारी हे मान्यताप्राप्त संघटनेच्या महिला प्रतिनिधीसमवेत बैठक घेऊन,प्रश्नांची सोडवणूक करतील. तसेच सह व्यवस्थापकीय संचालक यांच्या गैरहजेरीत महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) अध्यक्ष राहतील. |
| ९१ | प्रशासकीय कराराची अंमलबजावणी पुढील करार अंमलात येईपर्यंत चालू ठेवावी. | इतर मागण्यांच्या करारातील तरतुदी सध्या चालू आहेत, त्या पुढील करार होईपर्यंत चालू राहतील. |

| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| ९२ | दि.१.४.१९८८ पासून जुन्या वेतनश्रेणीतील मूळ वेतन रु.६८०/- होते अशा कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती दि.१.४.१९८८च्या करारातील कलम ४-१-५ नुसार दि.३०३.१९८९पर्यंत होती ती पुढे वाढवावी. | १९८८ च्या करारातील त्रुटी व विसंगती तपासणी करुन दूर करताना १९९६-२०००च्या करारातील कलम-११ची अंमलबजावणी करण्यात येईल. |
| ९३ | वैद्यकिय पर्याय अ/ब कार्यरत ठेऊन मेडिक्लेम योजना चालू करावी व रु.३५/- ऐवजी मूळ वेतनाचे १० टक्के वैद्यकिय भत्ता देण्यात यावा. | पोलिस खात्यामध्ये पोलिस,हवालदार यांना सध्या कॅश लेस कार्डची जी योजना लागू आहे अशी योजना पोलिस खात्याकडून मागविण्यात आलेली असून, सदरची योजना प्राप्त होताच त्याचा अभ्यास करण्यात येईल व त्यानंतर मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करून सदरची योजना कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत योग्य निर्णय घेण्यात येईल. |
| ९४ | चालक/वाहकांसाठी उत्पन्नाशी निगडीत असणारी प्रोत्साहन योजना तयार करताना मान्यताप्राप्त संघटना प्रतिनिधींच्या समवेत चर्चा करुन कायमस्वरुपी योजना लागू करावी. | चालक/वाहकांसाठी उत्पन्नाशी निगडीत असणाऱ्या प्रोत्साहन योजनेमुळे जर महामंडळाचे उत्पन्न (Revenue) वाढत असेल तर मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करुन प्रोत्साहन योजना तयार करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. |
| ९५ | विनातिकीट प्रवाशी प्रवास करताना आढळल्यास सर्वस्वी जबाबदार धरण्यात यावे व संबंधित वाहकास जबाबदार धरण्यात येऊ नये. | बीएमटीसी व शहर वाहतूकीमध्ये ५५ सीटच्या वर प्रवाशी असतील अशा वेळी विना तिकिट प्रवाशी सापडल्यास बेस्ट प्रमाणे वाहकास जबाबदार धरू नये या मागणीच्या अनुषंगाने बेस्ट उपक्रमाकडून माहिती घेऊन याबाबत चर्चा करण्यात येईल. |
| ९६ | २५ वर्षे अपधात विरहित सेवेचे बक्षिस देताना अपघातामध्ये चालकास प्रशासनाने/ पोलिस खात्याने/ न्यायालयाने / खात्याने जबाबदार धरले नसले तर सदर चालकास बक्षिसपात्र ठरवावे. तसेच निवडश्रेणीचे लाभास त्यांना पात्र ठरवावे. | याबाबत प्रसारीत केलेल्या परिपत्रकाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने फेर परिपत्रकीय सूचना प्रसारीत करण्यात येतील. |
| ९७ | अनुकंपा तत्वावर नोकरी देताना दिवंगत अथवा वैद्यकिय अपात्र झालेल्या कर्मचा-यांच्या विवाहित मुलीला रा.प. महामंडळात नोकरी देण्यात यावी. | अनुकंपा तत्वावरील सेवेसाठी प्रकरण मंजूर ते नेमणूक या कालावधीमध्ये अशा अविवाहित मुलीने लग्न केले म्हणून तिला नोकरीपासून वंचित ठेवता येणार नाही. या मा.उच्च न्यायालयाने दिलेला निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने प्रसारीत केलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल. |

| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| ९८ | म.रा.मा.प.महामंडळ कामगार शिक्षण योजना | सदर योजनेत कर्मचा-यांकडून दरमहा रु.५/- या दराने कर्मचा-यांच्या वेतनातून कपात करण्यात येत आहे,ती या पुढेही तशीच चालू राहील. तसेच सदर योजनेमध्ये महामंडळ अंशदान म्हणून प्रतिवर्षी रु.६०लाख जमा करेल असे महामंडळ ठराव क्र.२००८:१०:०८ दि.१३.१०.२००८ अन्वये मान्य केलेले आहे,ते यापुढेही तसेच चालू राहील.सध्या अस्तित्वात असलेल्या योजनेत काही बदल करावयाचा झाल्यास मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करून बदल करण्यात येईल. |
| ९९ | म.रा.मा.प.महामंडळ कर्मचारी कुटूंब कल्याण योजना,नैसर्गिक आपत्ती व मृत्यु प्रसंगी सहाय्य योजना | म.रा.मा.प.महामंडळ कर्मचारी कुटूंब कल्याण योजना, नैसर्गिक आपत्ती व मृत्यु प्रसंगी सहाय्य योजना. सदर योजनेसाठी दि.१.४.२००४ पासून कर्मचा-यांच्या वेतनातून दर महा रु.४०/- कपात करण्यात येत आहे,तीं या पुढेही तशीच चालू राहील. सदर योजनेसाठी महामंडळ दरवर्षी रु.१ कोटी ५० लाख इतकी रक्कम अंशदान म्हणून देण्याचे महामंडळ ठराव क्र.२००८:१०:०९ दि.१३.१०.२००८ अन्वये मान्य केलेले आहे,ते यापुढेही तसेच चालू राहील. सदर योजनेनुसार खालील प्रमाणे अर्थ सहाय्य लागू करण्याचे मान्य करण्यात आलेले आहे.<br>• रा.प.सेवेत असतांना कर्मचारी मृत्यु पावल्यास त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी रु.५०००/- ची तातडीची मदत देण्यात येईल व रु.१ लाख रक्कम वारसाच्या नावे महामंडळाच्या मुदत ठेव योजनेत ५ वर्ष मुदतीसाठी ठेवण्यात येईल.<br>• दंगे व पूर,भूकंप इ.नैसर्गिक आपत्ती या कारणामुळे कर्मचा-यांचे नुकसान झाल्यास रु.२०००/- पर्यन्त आर्थिक सहाय्य अदा करण्यात येईल.<br>• सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचारीं यांना सेवानिवृत्त प्रसंगी अल्पशी भेट म्हणून प्रत्येकी रू.२०००/- देण्यात येतील.<br>सध्या अस्तित्वात असलेल्या योजनेत काही बदल करावयाचा झाल्यास मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करून बदल करण्यात येईल. |
| १०० | **व्यवस्थापनाचा मुद्दा**<br>उत्पादकता वाढविण्यासाठी बस बांधणीसाठी लागणाऱ्या सध्याच्या तासामध्ये घट करावी. | उत्पादकता वाढविण्यासाठी बस बांधणीच्या सध्याच्या तासामध्ये २०० तास कमी करण्यात येतील. त्यामुळे बचत होणारी रक्कम मध्यवर्ती कार्यशाळेतील पायाभूत सुविधा वाढविणे व नविन मशिनरीसाठी खर्च करण्यात येईल. |

| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| १०१ | **व्यवस्थापनाचा मुद्दा**<br>आगारातील सध्याची सायनिंग ऑफ ची वेळ कमी करावी. | चालक-वाहकांची त्यांच्या आगारात सुरु होऊन त्यांच्याच आगारात संपणाऱ्या कामगिरीसाठी सायनिंग ऑफ ची वेळ १५ मिनिटांनी कमी करण्यात येईल. |
| १०२ | सर्वसाधारण | १.हा समझोता महामंडळ व राज्य सरकार यांच्या मान्यतेच्या अधिन राहील.<br>२.या समझोत्याच्या अटीचा अर्थ लावण्याबाबत विवाद निर्माण झाला तर त्याबाबत महामंडळ संबंधीत पक्षकारांचे म्हणणे ऐकून निर्णय घेईल व तो निर्णय अंतिम असेल.<br>३.अन्यत: इतर खंडामध्ये स्पष्टपणे तरतूद केली नसेल तर सदर समझोता, समझोत्यावर सहया केल्याच्या तारखेपासून अंमलात येईल.<br>४.या कराराची अंमलबजावणी करताना देय रकमेपेक्षा अधिक रक्कम कर्मचाऱ्यास अदा झाल्यास अशी रक्कम त्या कर्मचाऱ्याकडून वसुल केली जाईल.<br>५.या कराराच्या तरतुदीच्या अनुषंगाने त्रुटी व विसंगती निर्माण झाल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी "वाद निवारण समिती" (Dispute Redressal Committee) स्थापन करण्यात येईल. या समितीचे सह व्यवस्थापकीय संचालक अध्यक्ष व महाव्यवस्थापक (क.व औ.सं.),उप महाव्यवस्थापक (वित्त) हे सदस्य / तर मुख्य कामगार अधिकारी सदस्य सचिव असतील. ही समिती उपस्थित केलेल्या मुद्दयांवर मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करुन ६ आठवड्यात व्यवस्थापनास शिफारस करेल. सह व्यवस्थापकीय संचालक हे पद रिक्त असेल त्यावेळी सदर समितीच्या अध्यक्षपदी महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) राहतील.<br>६.या कराराच्या कालावधीत ज्यामध्ये वित्तिय भार अंतर्भूत आहे अशा कोणत्याही मागण्या केल्या जाणार नाहीत. तसेच कराराच्या कालावधीत संपावर जाणे/मंदगतीने काम/लेखणीबंद आंदोलन/उपोषण/धरणे/ घेराव इत्यादी मार्गाचा अवलंब करणार नाहीत. याशिवाय अनधिकृत अनुपस्थिती, महामंडळाच्या मालमत्तेचे नुकसान, हिंसाचार, घातपात, काम थांबणे अशा प्रकारच्या व इतर बेकायदेशीर कृत्यामध्ये मान्यताप्राप्त संघटना भाग घेणार नाही किंवा प्रोत्साहन देणार नाही किंवा ते कृत्य माफ करण्याकरीता पुढाकार घेणार नाही. |

१२१



| मागणी क्र. | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| | | ७.कराराच्या अंमलबजावणीबाबत मध्यवर्ती कार्यालयाने निर्गमित केलेली परिपत्रके,संयुक्त विचार विनिमय समितीमधील निर्णयाच्या अनुषंगाने देण्यात आलेले लिखित स्वरूपातील आदेश व निर्गमित करण्यात आलेली परिपत्रके तसेच कायद्याच्या तरतुदी यांची अंमलबजावणी होत नसल्याबाबत मान्यताप्राप्त संघटनेने स्पष्ट उदाहरणे देऊन लेखी तक्रार केल्यास चौकशीअंती योग्य ती प्रक्रिया अवलंबिली जाईल.<br>८.१९९६-२०००,२०००-२००४,२००४-२००८ व २००८-२०१२ या करारातील आर्थिक लाभ, सोयी सवलती व तरतूदी या करारामुळे सुधारल्या अथवा वगळल्या असतील त्या सोडून अन्य आर्थिक लाभ, सोयी सवलती व तरतूदी चालू राहतील. वगळलेल्या तरतुदी जोडपत्र-इ प्रमाणे राहतील.<br>९.सन २०१२ ते २०१६ या कराराची मुदत संपल्यानंतर या करारातील आर्थिक लाभ, सोयी सवलती, तरतुदी पुढील करार होईपर्यंत अंमलात राहतील. |

साक्षीदार

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळासाठी
व त्याच्यावतीने

दीपक कपूर

श्री.दीपक कपूर, भा.प्र.से.
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

कॅप्टन रा. रा. पाटील
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

कामगारांच्यावतीने मान्यताप्राप्त संघटनेचे प्रतिनिधी

श्री.शिवाजीराव चव्हाण
अध्यक्ष,
महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना

श्री.हनुमंत ताटे
जनरल सेक्रेटरी,
महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना

ठिकाण- मुंबई.

दिनांक - २१.०६.२०१३

D:\Settlement Draft,2012-16-(2).doc(29)

## जोडपत्र- ''अ''

**तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या (नियमित ) प्रवर्ग निहाय वेतनश्रेणी दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | प्रवर्ग | दि.१-४-२०१२ पासूनची वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १. | स्वच्छक | ३६६० -११९७७ |
| २. | परिचर/ईशाराकार/खलाशी/सुरक्षा रक्षक /चपराशी/ऑर्डर्ली/ सफाईगार/ हमाल/ पाणीवाला / मजदूर | ४१८० -१३६७५ |
| ३. | नाईक/ लिफ्ट चालक/सहाय्यक माळी | ४२७० - १३९६५ |
| ४. | खानसामा /अतिथ्यालय परिचर / व्दारपाल / हवालदार | ४३५० -१४२२५ |
| ५. | सहाय्यक (मदनतीस) | ४३५० -१४२२५ |
| ५-अ | वाहक | ४३५० -१४२२५ |
| ६. | माळी /यारी चालक | ४३५०-१४२२५ |
| ७. | तारतंत्री / तारतंत्री निपंप परिचर/ सहाय्यक बांधणीकार/ सुतार / रंगकार / गंवडी/नळ कारागीर (कारा.''ब'') | ४६२० -१५१०९ |
| ८. | सहा.कारागीर/प्रमुख व्दारपाल / मुकादम | ४६२० -१५१०९ |
| ९. | चालक | ४७०० -१५३६७ |
| १०. | वाहतुक नियंत्रक | ४८८० -१५९५५ |
| ११. | इमारत निरीक्षक / निरीक्षक स्थापत्य / दुरध्वनी सहाय्यक / दुरध्वनी चालक / कल्याण निर्देशिका / कनिष्ठ कारकून / सहाय्यक रोखपाल / भांडार कारकून / कारकून (समयवेतन शाखा) / कारकून - टंकलेखक / टंकलेखक / संगणक / अनुरेखक /कारकून निम समयपाल / यंत्रगणक/ यंत्रवाला (मुद्रणालय) / जुळारी / बांधणीकार / छिद्रांक टंकंक / पडताळक / सहाय्यक चालक ( यंत्र) / पत्ता यंत्रचालक (अड्रेमा) / मिश्रक / लघुंलेखन भत्यासह टंकलेखक | ४७९० - १५६६३ |

१७



| अ.क्र. | प्रवर्ग | दि.१-४-२०१२ पासूनची वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १२. | कारागीर''क''/यंत्र कारागीर (कारागीर क)/ विजतंत्री(स्थापत्य)/ रोटरी यंत्रवाला / प्रदोपक चालक/ सहा. वाहतूक निरीक्षक/ सहा.सुरक्षा निरीक्षक.. | ५०५० - १६६११ |
| १३. | प्रमुख कारागीर / मुख्य कामगार / रोटरीवाला / मुद्रीतशोधक / प्रमुख जुळारी | ५७५० - १८८०४ |
| १४. | वरीष्ठ लिपीक (कनिष्ठ सहाय्यक) / वरीष्ठ कारकून / लघुलेखक (ख) / लघुटंकलेखक / वरिष्ठ रोखपाल / तंत्रज्ञ / कनिष्ठ संगणक चालक / आरेखक (स्थापत्य) /उप अभियंता / समयलेखक / सहाय्यक भांडारपाल / प्रमुख समयपाल/ सहा. आगरक्षक / परिचारक / स्वच्छता निरीक्षक /राखण व पहारा निरीक्षक. | ५७५० - १८८०४ |
| १५. | लेखाकार / लेखा निरीक्षक / भांडारपाल / इंधन / आस्थापना पर्यवेक्षक / पर्यवेक्षक/कनिष्ठ संग्रह पडताळक/ वाहतुक निरीक्षक /नियोजन निरीक्षक/ वाणिज्य निरीक्षक /तंत्र निरीक्षक/ खाद्यपेय व्यवस्था निरीक्षक / प्रशिक्षण निरीक्षक / प्रवाशी सुविधा निरीक्षक /लघुलेखक (क) /प्रभारक / वरिष्ठ संगणक चालक / आरेखक यांत्रिकी / आगरक्षक / लघुलेखक (कनिष्ठ) / लघुलेखक (मराठी)/सुरक्षा निरीक्षक | ६७९० - २२१९१ |
| १६. | विभागीय लेखाकार / कार्यालय अधिक्षक / विधी अधिक्षक / आधार सामुग्री / संस्करण अधिक्षक / भांडार पर्यवेक्षक /वरिष्ठ संग्रह पडताळक / सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक / सहाय्यक वाहतूक अधिक्षक /डेपो व्यवस्थापक (ख)/कनिष्ठ कार्यदेशक/ कनिष्ठ कार्यदेशक (यांत्रिक) / तंत्र सहाय्यक/वाणिज्य प्रसिध्दी निरीक्षक/प्रमुख आरेखक (स्थापत्य,यंत्र) / कनिष्ठ अभियंता (विद्युत ,स्थापत्य )/ कला कार्याअधिकारी / लघुलेखक (वरिष्ठ) / विभागीय सुरक्षा निरीक्षक | ७६६० - २५०२० |
| १७. | वरिष्ठ कार्यदेशक / शाखा अभियंता | ७८३० - २५५८१ |

**टीप :-** वार्षिक वेतन वाढीचा दर :- वार्षिक वेतन वाढीचा दर ३% ने संचित परिणामी परिगणित केला आहे व त्यानुसार ४०वर्षाचा कालावधी विचारीत घेऊन प्रत्येक वेतनश्रेणीचा कमाल टप्पा परिगणित केला आहे.

## जोडपत्र- ''ब''

### तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या (कनिष्ठ श्रेणी)प्रवर्ग निहाय वेतन श्रेणी दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | प्रवर्ग | सद्याची कनिष्ठ वेतनश्रेणी | दि.१-४-२०१२ पासून सुधारित कनिष्ठ वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | स्वच्छक | २०९०- २८९८ | ३३००-३६०७ |
| २ | शिपाई / सुरक्षा रक्षक / सफाईगार | २२७० - ३१५० | ३३००-३६०७ |
| ३ | वाहक /सहाय्यक (मदतनीस ) | २४४० - ३३८४ | ३९५०-४३१८ |
| ४ | प्रमुख व्दारपाल | २६०० - ३६०४ | ३९५०- ४३१८ |
| ५ | चालक | २७९० - ३८७० | ४०२५-४४०० |
| ६ | लिपिक - टंकलेखक | २८८० - ३९९४ | ४०५०-४४२७ |
| ७ | सहाय्यक सुरक्षा निरीक्षक | ३०३० - ४२०० | ४०५०-४४२७ |
| ८ | व. लिपिक / क. सहाय्यक | ३४०० - ४७१३ | ४१००-४४८१ |
| ९ | राखण व पहारा निरीक्षक | ३४५० - ४७८३ | ४१२५-४५०९ |
| १० | प्रभारक/वाहतूक निरीक्षक/ सुरक्षा निरीक्षक/ लेखाकार/ भांडारपाल/ आरेखक(यां.)/ आगरक्षक/ वरिष्ठ संगणक चालक/ कनिष्ठ संग्रह पडताळक / आस्थापना पर्यवेक्षक / वरिष्ठ सहाय्यक / कनिष्ठ लघुलेखक | ४१०० - ५६८० | ४१६०-४५४७ |
| ११ | कनिष्ठ कार्यदेशक/ सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक / सहाय्यक वाहतूक अधीक्षक / प्रमुख आरेखक/ सहाय्यक तांत्रिक / विभा. लेखाकार/वरिष्ठ संग्रह पडताळक/ कार्यालय अधीक्षक/ वरिष्ठ लघुलेखक/ कनिष्ठ अभियंता (स्था.)(वि.) | ४६०० - ६३७३ | ४६००-५०२८ |
| १२ | वरिष्ठ कार्यदेशक | ४७०० - ६५१२ | ४७००-५१३७ |

१९२



## जोडपत्र- ''क''

### एकत्रित वेतनावरील कर्मचाऱ्यांसाठी सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणी.

| अ. क्र. | प्रवर्ग | सध्याचे सुधारित एकत्रित वेतन | दि.१-४-२०१२ पासून सुधारित कनिष्ठ वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक कारागीर(कनिष्ठ) | रू.४६२०/-एकत्रित (फिक्सड्) प्रतिमाह वेतन, प्रतिवर्षी रू.१३९/- वार्षिक वाढ . | ३९७५-४२१८ |
| २ | वाहतूक नियंत्रक (कनिष्ठ) | रू.४८८०/-एकत्रित (फिक्सड् ) प्रतिमाह वेतन, प्रतिवर्षी रू. १४७/- वार्षिक वाढ | ४०५०-४४२७ |
| ३ | कारागीर'क' (कनिष्ठ) | रू.५०५०/-एकत्रित(फिक्सड्)प्रतिमाह वेतन, प्रतिवर्षी रू. १५२/-वार्षिक वाढ. | ४०७५-४४५४ |
| ४ | सहाय्यक वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ) | रू.५०५०/-एकत्रित (फिक्सड्) प्रतिमाह वेतन,प्रतिवर्षी रू. १५२/-वार्षिक वाढ. | ४०७५-४४५४ |
| ५ | प्रमुख कारागीर(कनिष्ठ) / सहाय्यक भांडारपाल (कनिष्ठ) | रू.५७५०/-एकत्रित (फिक्सड् ) प्रतिमाह वेतन, प्रतिवर्षी रू. १७३/- वार्षिक वाढ | ४१००-४४८१ |

## जोडपत्र - ड

## हंगामाच्या कालावधीसाठी चालक,वाहक व कार्यशाळा कामगारांसाठी सुधारीत उपस्थिती प्रोत्साहन योजना

**हंगामाच्या कालावधी**

चालक, वाहक व आगार कार्यशाळेसाठी - दि.२५ एप्रिल ते १२ जून ( दोन्ही दिवस धरून )

विभागीय कार्यशाळा कामगारांसाठी - दि.१२ फेब्रुवारी ते ३१ मार्च ( दोन्ही दिवस धरून)

| अ.क्र. | प्रत्यक्ष कामाचे दिवस | चालक,मुख्य कारागीर, कारागीर 'क' | वाहक ,सहाय्यक कारागीर, सहाय्यक, स्वच्छक |
|---|---|---|---|
| १. | ४२ | रू. १८०/- | रू.१३५/- |
| २. | ४१ | रू. १६५/- | रू.१२०/- |
| ३. | ४० | रू. १५०/- | रू.१०५/- |
| ४. | ३९ | रू. १३५/- | रू.९०/- |
| ५. | ३८ | रू. १२०/- | रू.७५/- |
| ६. | ३७ | रू. १०५/- | रू.६०/- |
| ७. | ३६ आणि त्यापेक्षा कमी | काही नाही | काही नाही |

**टिप :**

१) या उपस्थिती प्रोत्साहन योजनेमध्ये फक्त ५ दिवसांपर्यन्तची गैरहजेरी मान्य करण्यात येईल व सदरहू कालावधीमध्ये ३७ दिवसांपेक्षा कमी दिवस हजर राहणा-या कामगारांना सदर बक्षिसाची रक्कम मिळणार नाही.

२) खाते वाहन चालकांना (स्टाफ कार चालक) ज्यांच्याकडे पी.एस.व्ही.बॅच नसेल त्यांना सदर प्रोत्साहन बक्षिसाची रक्कम मिळणार नाही.

३) वरील कालावधीमध्ये निलंबित केलेल्या कर्मचा-यांना सदर प्रोत्साहन बक्षिसाची रक्कम मिळणार नाही.

४) चालक/वाहकाने त्यांच्या प्रत्यक्ष बस चालन/वाहक कामाएवेजी प्रशासकीय कारणास्तव त्यांना इतर कामासाठी वापरले असेल तर त्यांना सदर बक्षिसाची रक्कम वरील योजनेनुसार मिळेल.

******

## जोडपत्र - इ

| अ.क्र. | कामगार करार | वगळण्यात आलेली/पुढील करारात आल्यामुळे रद्द झालेली कलमे. |
|---|---|---|
| १ | १९९६-२००० | १, २, ३, ३(१), ३(२), ३(इ), ४, ५, ६,७, ८, ८(अ), ९, १०, १२ (१ ते १९),१६(अ),१८,२१(अ), २२(३),२२(५), ३९, ५१, ७६, ७७, ९४, १०२, १०३, १०८(१.२), ११०(२अ ते ई),११६, १३२, १३३, १३८, १४६(८), १४८, १४९. |
| २ | २०००-२००४ | १, २, ३, ४, ५, ६, ७, ८,९,१०,११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २५. |
| ३ | २००४-२००८ | १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २५, २६, २८, ३०, ३३, ३४, ३५, ३६. |
| ४ | इतर मागण्यांच्या कामगार करार | १, १२, १७. |
| ५ | २००८-२०१२ | १, २, ३, ४(१), ४(२), ५, ६, ७, ८(अ) ते (क), १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १८, १९, २०, २१(१) ते (१९), २२, २३, २४. |
| ६ | सन २०१२-२०१६ | शासनाकडून खालील १२ कलमे पत्र क्र.एसटीसी-१०१२/प्र.क्र.९२३/परि-१ दि. ०४/०४/१६ अन्वये वगळण्यात आली. ४५, ४६, ४८, ४९, ५०, ६२, ६६, ७९, ८३, ९०, ९४, ९८. |

*****